20-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/19/2025 11:48 PM Page 1

जप्त केलेले अंबरग्रीस केरळ प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवणार

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १९ : सांगे पोलिसांनी कारवाई करत जप्त केलेले स्पर्म व्हेलच्या उलटीपासून तयार होणारे अत्यंत दुर्मिळ व मौल्यवान अंबरग्रीस सत्यता तपासण्यासाठी केरळच्या प्रयोगशाळेत पाठवले जाणार आहे, अशी माहिती सांगे पोलिसांनी गुरुवारी दिली.

या अंबरग्रीसचे वजन ५.७५ किलो असून आंतरराष्ट्रीय बाजारात त्याची अंदाजे किंमत *०.०६ कोटी रुपये इतकी आहे. या प्रकरणी चार संशयितांना आधीच अटक करण्यात आली आहे.

अंबरग्रीस, ज्याला व्हेल उलटी किंवा व्हेल वोमीट म्हणूनही ओळखले जाते, हा स्पर्म व्हेलच्या आतड्यांमध्ये तयार होणारा अत्यंत दुर्मिळ पदार्थ आहे. सुगंधी द्रव्यांसाठी (विशेषतः परफ्युम उद्योगात) त्याला खूप मोठ्या किंमतीत मागणी असते. मात्र, भारतासह अनेक देशांत याचा व्यापार वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत बेकायदेशीर मानला जातो.

सांगे पोलिसांनी सांगितले की, जप्त करण्यात आलेल्या अंबरग्रीसचे परीक्षण केरळमधील प्रयोगशाळेत डीएनए विश्लेषणाद्वारे केले जाईल. सदर नमुन्यांची वैधता ठरवण्यासाठी वन आणि वन्यजीव विभाग तसेच महसूल गुप्तचर संचालनालय यांची मदत घेतली जाते. आम्ही संपूर्ण मुद्देमाल तपासणीसाठी केरळला पाठवत आहोत, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणात सचिन म्हात्रे – पेण, रायगड, राऊत साईनाथ शेट – फोंडा, रतुकांत कारापूरकर – , झुआरीनगर आणि योगेश रेडकर – सावंतवाडी, यांना अटक करण्यात आली आहे. या चौघांवर वन्यजीव (संरक्षण) कायदा, १९७२ मधील कलम ३९, ४४, ४९ब आणि ५१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, त्यांनी कोणताही कायदेशीर परवाना नसताना, आर्थिक फायद्यासाठी अंबरग्रीसचा अवैध व्यापार करण्याचा प्रयत्न केला होता.

या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक कविता राऊत यांच्या नेतृत्वाखाली सुरू असून, अंबरग्रीसची उत्पत्ती, साठवणूक व विक्री जाळ्याचे आंतरराज्यीय संबंध आहेत का, याचा तपासही करण्यात येत आहे.

मडगाव मास्टर प्लॅनला नागरिकांचा तीव्र विरोध

नागरी प्रकल्पांसाठी अधिग्रहित केलेली जमीन मास्टर प्लॅनमधून वगळली | आराखड्यातील प्रस्ताव सुसंगत नाहीत

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १९ : मडगाव मास्टर प्लॅन २०४१ च्या सार्वजनिक सादरीकरणादरम्यान गुरुवारी नागरिकांचा तीव्र विरोध पाहायला मिळाला. या योजनेच्या आशयात व प्रक्रियेत गंभीर त्रुटी असल्याचा आरोप करत स्थानिक रहिवाशांनी आणि कार्यकर्त्यांनी प्रशासनावर सवालांचा भडिमार केला.

सादरीकरणावेळी नागरिकांनी पायाभूत सुविधांवरील आव्हाने, सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा स्थळांचे जतन, तसेच मडगाव व फातोर्डा भागांतील वास्तवाशी सुसंगत नसलेले प्रस्ताव यावर आक्षेप नोंदवले. मास्टर प्लॅन तयार करणाऱ्या सल्लागार संस्थेला स्थानिक समस्यांची नीट माहिती नसल्याचेही नागरिकांनी स्पष्ट केले.

यावेळी सर्वाधिक चर्चेत आलेला मुद्दा म्हणजे गोवा राज्य शहरी विकास प्राधिकरणाने (जीएसयूडीए) यापूर्वी विविध नागरी प्रकल्पांसाठी अधिग्रहित केलेली जमीन मास्टर प्लॅनमधून वगळण्यात आल्याची अधिकृत कबुली. या निर्णयामुळे नागरिक संतप्त झाले असून त्यांनी यासंदर्भात स्पष्टता मागितली.

फातोर्डा परिसरातील नागरिकांनीही योजना तयार करताना त्यांच्या भागाची संपूर्णपणे उपेक्षा झाल्याची भावना व्यक्त केली. मडगाव नगरपालिकेच्या अधिकारक्षेत्रात असूनही त्यांच्या भागाचे समावेशात दुर्लक्ष का झाले, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला.

स्थानिक कार्यकर्ते आशिष कामत यांनी प्रशासनाकडे थेट सवाल करत म्हटले, हा आराखडा केवळ मडगावपुरता मर्यादित आहे की संपूर्ण नगरपरिषदेच्या क्षेत्रासाठी आहे ? जर फातोर्डा समाविष्ट असेल, तर त्याचा स्पष्ट उल्लेख का करण्यात आलेला नाही ?

योजनेचा आधार २०११ मधील आऊटलाइन डेव्हलपमेंट प्लॅनवर (ओडीपी) असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले, मात्र ओडीपी ला न्यायालयात आव्हान देण्यात आले असून त्याच्या भू–वापर नकाशांवर बनावटगिरीचा आरोपही झालेला आहे. त्यामुळे २०४१ पर्यंत विकासाचे दिशादर्शक म्हणून सादर करण्यात आलेल्या मास्टर प्लॅनची वैधता व अचूकतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

कामत यांनी स्पष्ट केले की, हा आराखडा जमिनीवरील वास्तवाशी विसंगत आहे. फक्त कागदोपत्री सुधारणा सुचवल्या जात आहेत, मात्र प्रत्यक्षात गरजेच्या जमीन वाटपासंबंधी कोणतीही भूमिका घेतली जात नाही. त्यांनी यावरही प्रकाश टाकला की, मडगाव नगरपालिकेने अद्याप जिल्हा विकास आराखडा तयार केलेला नाही, जो कायद्याने अनिवार्य आहे. या मूलभूत दस्तऐवजाविना मास्टर प्लॅन अंतिम करण्याची घाई का केली जात आहे, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

याचवेळी नागरिक सॅव्हियो कुतिन्हो यांनी रिंग रोड प्रकल्प, अनौपचारिक विक्रेत्यांसाठी उपाययोजना (गड्डा व्यवस्था), तसेच साळ नदीभोवती प्रस्तावित बफर झोन यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांकडे लक्ष वेधले. त्यांनी म्हटले की, नदीच्या पर्यावरणीय ऱ्हासाला आळा घालण्यासाठी या आराखड्यात कोणतेही ठोस उपाय दिसत नाहीत.

एकूणच, मडगाव व फातोर्डा भागातील नागरिक व कार्यकर्त्यांनी या मास्टर प्लॅनवर गंभीर शंका व्यक्त करत, तो प्रत्यक्ष गरजांशी सुसंगत नाही असे स्पष्ट केले. त्यांनी अधिक पारदर्शक, सहभागी आणि कायदेशीर मान्यताप्राप्त प्रक्रिया राबवून नव्याने आणि व्यापक अशा आराखड्याची मागणी केली आहे.

पोल्ट्री कचरा वाढवणाऱ्यांवर कारवाईची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १९ : राज्यात रस्त्याच्या कडेला पोल्ट्री आणि मटण विक्रेत्यांकडून बेजबाबदारपणे टाकल्या जाणाऱ्या कचऱ्यामुळे वाढणाऱ्या अस्वच्छतेविरोधात ऑल गोवा पोल्ट्री शॉपकीपर्स असोसिएशनने आवाज उठवत स्थानिक स्वराज्य संस्थांकडून तातडीने आणि ठोस कारवाई करण्याची मागणी केली आहे.

असोसिएशनचे अध्यक्ष क्रिस्को सिक्वेरा यांनी मडगाव येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले की, राज्यभर पसरलेल्या कचरा टाकण्याच्या समस्येवर स्थानिक स्वराज्य संस्था आणि संबंधित विभागांनी संयुक्तपणे कारवाई केल्याशिवाय यावर नियंत्रण मिळवणे अशक्य आहे. या वेळी त्यांच्या समवेत कोषाध्यक्ष लिओ बॅरेटो उपस्थित होते.

डिसेंबर २०२३ मध्ये स्थापन झालेल्या या असोसिएशनचे सध्या राज्यात सुमारे ३३० नोंदणीकृत पोल्ट्री विक्रेते आहेत. मात्र, राज्यात एकूण विक्रेत्यांची संख्या १ हजार पेक्षा जास्त असून, त्यापैकी अनेकजण नोंदणीशिवाय व्यवसाय करत आहेत. या बेकायदेशीर विक्रेत्यांकडूनच बहुतांश वेळा नियमबाह्यपणे कचरा टाकला जातो, असे असोसिएशनने निदर्शनास आणले. सिक्वेरा यांनी स्पष्ट केले की, स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पोल्ट्री कचरा हाताळण्यासाठी पुरेश्या सुविधा नाहीत. तरीही, असोसिएशनने या समस्येवर स्वखर्चाने उपाययोजना सुरू केल्या आहेत.

राज्य सरकारने पूर्वी बायोटेक फर्मकडे कचरा पाठवण्याची शिफारस केली होती. मात्र, त्याचा खर्च छोट्या विक्रेत्यांना परवडत नसल्यामुळे, असोसिएशनने पिसुर्ले औद्योगिक वसाहतीतील एका खासगी युनिटशी समन्वय साधून प्रक्रिया सुरू केली आहे.

सध्या दक्षिण गोव्यातील अनेक विक्रेत्यांकडून, तसेच उत्तर गोव्यातील तीन ठिकाणांहून कचरा सात ट्रकद्वारे गोळा केला जातो. म्हापसा पालिकेतील ३७ दुकानांपैकी २२ दुकानांचा सहभाग असून, सहभागी विक्रेत्यांना दरमहा पावत्या दिल्या जातात. या पावत्यांचा वापर स्थानिक अधिकाऱ्यांना अधिकृत पुरावा म्हणून करता येतो.

सिक्वेरा यांनी खंत व्यक्त करत सांगितले की, नगरपालिका व ग्रामपंचायतीकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्यामुळे संपूर्ण व्यवस्थापन यंत्रणा अडचणीत आली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, विक्रेत्यांनी असोसिएशनसोबत सहभाग घेणे ऐच्छिक असले तरी, कुठल्याही परिस्थितीत जबाबदारीने कचरा विल्हेवाट लावणे गरजेचे आहे.जर स्थानिक संस्था विक्रेत्यांची नोंद ठेवून त्यांची माहिती आमच्यासोबत शेअर करतील, तर अशा गैरकृत्यांवर कारवाई शक्य होईल,असे ते म्हणाले.

पोल्ट्री कचऱ्याचे रस्त्याच्या कडेला खुले टाकणे ही केवळ सार्वजनिक आरोग्याची नव्हे तर पर्यावरणीय आपत्तीची दिशा आहे, असे सांगून सेक्विरा यांनी असा निष्कर्ष काढला की, स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य विभाग आणि विक्रेते सर्वांनी मिळून जबाबदारीने पावले उचलल्यासच ही समस्या नियंत्रणात येऊ शकते.असोसिएशनने स्पष्टपणे अधोरेखित केले आहे की, यापुढे रस्त्याच्या कडेला कचरा फेकणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे. राज्यातील सार्वजनिक स्वच्छता आणि पर्यावरणाचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी शासनाने ठोस आणि धोरणात्मक भूमिका घेणे अत्यावश्यक असल्याचे मत त्यांनी मांडले.

कला अकादमी अहवाल दक्षता विभागाकडे सादर ?

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १९ : राज्यातील बहुचर्चित कला अकादमी नूतनीकरण प्रकल्पातील भ्रष्टाचार, अनियमितता आणि बेकायदेशीर कंत्राट वाटप यासंबंधी चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या तांत्रिक समितीने अखेर आपला तपशीलवार अहवाल दक्षता विभागाकडे सादर केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. हा अहवाल सध्या दक्षता विभागाच्या सखोल तपासणीअंती राज्य सरकारकडे पाठवण्याच्या प्रक्रियेत असल्याचे समजते.

जानेवारी २०२३ मध्ये गठित या समितीला सुरुवातीस ६० दिवसांत चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे उद्दिष्ट होते. मात्र, चौकशीच्या विविध टप्प्यांमुळे यास दोन वर्षांहून अधिक वेळ लागला. नवीन समितीचे अध्यक्ष प्रमोद बदामी (मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग) यांच्या नेतृत्वाखाली समितीने गेल्या महिन्यात अहवाल सादर केला असल्याची माहिती संबंधीत सूत्रांनी दिली आहे.

समितीने या कालावधीत १५ हून अधिक बैठका घेतल्या असून, सार्वजनिक बांधकाम विभाग , कला आणि सांस्कृतिक संचालनालय तसेच कंत्राटदारांकडून जबाब नोंदवले गेले असल्याची माहिती आहे . नामांकित निविदा प्रक्रियेबाबतच्या कागदपत्रांची, अंदाजपत्रकांची आणि देयक तपशीलांची देखील बारकाईने छाननी करण्यात आली असल्याचे समजते.

गेल्या वर्षी मार्चमध्ये समितीच्या अध्यक्षपदाची सूत्रे घेतल्यानंतर बदामी यांनी चौकशीला गती दिली. त्यांच्या आधीच्या अध्यक्ष डॉ. आशिष रेगे (प्राचार्य, गोवा आर्किटेक्चरल कॉलेज) यांनी फेब्रुवारी २०२३ मध्ये निवृत्ती घेतली होती.

कला अकादमीच्या इमारतीचे नूतनीकरण तब्बल ५६ कोटी रुपये खर्चून करण्यात आले होते, मात्र यापैकी ४९ कोटी रुपयांच्या निधीचा गैरवापर झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला होता.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आणि दक्षता विभाग यांनी २०२२ मध्ये केलेल्या प्राथमिक चौकशीत प्रथमदर्शनी आर्थिक अनियमितता असल्याचे स्पष्ट केले होते. यानंतर सप्टेंबर २०२२ मध्ये तांत्रिक तपासणीसाठी समिती गठित करण्याची शिफारस करण्यात आली होती.

याआधी सरकारला सादर करण्यात आलेल्या कार्यदल समितीच्या अहवालात तब्बल २० त्रुटी अधोरेखित करण्यात आल्या होत्या. यावर उपाययोजना म्हणून सरकारने पुढील कामांसाठी सल्लागारांची नियुक्ती केली आहे.

या तांत्रिक अहवालानंतर राज्य सरकारकडून कोणती कारवाई होते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. गोवा सरकारच्या प्रतिष्ठेच्या प्रकल्पांपैकी एक असलेल्या कला अकादमीच्या नूतनीकरणात एवढ्या मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांमुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ऋण वसुली न्यायाधिकरण–2, दिल्ली
4था मजला, जीवन तारा बिल्डींग, पार्लमेंट मार्ग, नवी दिल्ली–110001

टी.आर.सी. क्र. 121-2022 — **विक्री उद्घोषणा नोटीस**

स्टेट बँक ऑफ इंडिया विरुद्ध मे. अवंत डेव्हलपमेंट्स प्रा. लि.

बँका व आर्थिक संस्थाना देय कर्जाची वसुली कायदा, 1993 सह आयकर कायदा, 1961 मधील दुसऱ्या अनुसुचीच्या नियम 38, 52(2) खाली विक्री उद्घोषणा

प्र.क.# 1 अवंत डेव्हलपमेंट्स प्रा. लि., डी–**25**, अन्सल व्हिला फार्म्स, सातबारी गांव, मेहरावली, नवी दिल्ली–**110030**
तसेच येथे : अफ–**12**, **1** ला मजला, ग्लोबल ऑर्चिड आर्केड, ग्लोबल बिझनेस पार्कजवळ, ए.जी. मार्ग, गुडगाव–**122002**
प्र.क.# 2 श्री. अश्विनी कुमार हांडा, डी–**25**, अन्सल व्हिला फार्म्स, सातबारी गांव, मेहरावली, नवी दिल्ली–**30**
प्र.क.# 3 श्रीमती मधु हांडा, श्री अश्विनीकुमार हांडा यांच्या पत्नी, डी–**25**, अन्सल व्हिला फार्म्स, सातबारी गांव, मेहरावली, नवी दिल्ली–३०
प्र.क.# 4 श्री. नितीन हांडा, श्री. अश्विनी कुमार हांडा यांचा मुलगा, डी–**25**, अन्सल व्हिला फार्म्स, सातबारी गांव, मेहरावली, नवी दिल्ली–३०
प्र.क.# 5 अवंत ग्रँड डेव्हलपमेंट्स प्रा. लि., डी–**25**, अन्सल व्हिला फार्म्स, सातबारी गांव, मेहरावली, नवी दिल्ली–**30**
प्र.क.# 6 मे. गेटमोअर डेव्हलपमेंट्स प्रा. लि., डी–**25**, अन्सल व्हिला फार्म्स, सातबारी गांव, मेहरावली, नवी दिल्ली–**30**.

1.ज्याअर्थी, मा. पीठासन अधिकारी, ऋणवसुली न्यायाधिकरण क्र. **2** यांनी पारित केलेल्या मूळ अर्ज (ओए) क्र. **92-2013** मधील हस्तांतर वसुली प्रमाणपत्र अनुसार **रु. 31,57,76,567.78/- (रु.एकतीस कोटी सत्तावन्न लाख शहात्तर हजार पाचशे सदुसष्ट व पैसे अठ्ठ्याहत्तर फक्त)** अधिक दवा दाखल केल्यापासून किमती व चार्जेससह प्रमाणित कर्ज बुडवेदारांकडून वसुली पूर्ण होईपर्यंत **03.06.2023** पासून प्रति वर्ष **13%** दराने भविष्यातील व्याज व पेंडेंटाईट सहित वसुली प्रमाणपत्र काढले आहे.
2. आणि ज्याअर्थी, खाली सही करणाऱ्याने सदर प्रमाणपत्राच्या समाधानात खालील अनुसूचीत वर्णिलेल्या मालमत्तेच्या विक्रीचा आदेश दिला आहे.
3. याद्वारे नोटीस देण्यात येते की, पुढे ढकलण्याच्या आदेशाच्या अनुपस्थितीत सदर **मालमत्ता ई–लिलावाद्वारे विकली जाईल सदर बोली https://www.bankeauctions.com संकेतस्थळावरून ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बिडींगद्वारे २३.०७.२०२५ रोजी सकाळी 11.00 ते 12.00 या वेळात दुपारी 12.00 नंतर 5 मिनिटांच्या विस्तारासह, गरज भासल्यास,** लावल्या जातील.
4. विक्री ही खाली दिलेल्या अनुसुचितील दिलेल्या वरील नावांच्या प्रमाणित कर्जदारांची (सीडी) मालमत्ता आहे आणि प्रत्येक संचाच्या समोर दिलेल्या अनुसुचित दिलेली सदर मालमत्तेस दायित्वे व दावे जोडलेली आहेत, जी आत्तापर्यंत काढलेली आहेत.
5. खालील अनुसुचित दिल्यानुसार मालमत्ता विक्रीसाठी ठेवली जाईल. मालमत्तेच्या भागाच्या विक्रीने देय रकमेचे समाधान झाल्यास रिमाईंडरसंबंधी सदर विक्री त्वरित थांबवली जाईल. तसेच जर सदर प्रमाणपत्रात दिलेल्या देय रकमांइतकी रक्कम कोणत्याही संचातून मिळाल्यास सदर विक्री थांबवली जाईल आणि विक्री आयोजित करणाऱ्या अधिकाऱ्याकडे व्याज किमती (विक्रीच्या किमतीसहित) सादर केल्यास आणि अशा प्रमाणपत्राची ती रक्कम खाली सही करणाऱ्याकडे व्याज व किमर्तीसह त्यांचे समाधान होईतो दिली आहे असा पुरावा सादर केल्यास विक्री थांबवली जाईल.
6.कोणीही अधिकारी वा इतर व्यक्ती, जी विक्रीसंबंधी त्यांचे कर्तव्य बजावत असेल ती प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे बोली लावू शकणार नाही किंवा विकल्या जाणाऱ्या मालमत्तेत कोणताही हितसंबंध संपादित करू शकणार नाही वा संपादित करण्याचा प्रयत्नही करू शकणार नाही.
7. आयकर कायदा, **1961** च्या दुसऱ्या अनुसुचित विहित केलेल्या अटींना व त्याखालील नियमांखाली व तसेच यापुढील अटींना सदर विक्री लागू होईल.
7.1 येथे जोडलेल्या परिशिष्टात दिलेले तपशील खाली सही करणाऱ्याच्या सर्वोत्तम माहितीनुसार आहेत, परंतु या उद्घोषणेतील कोणतीही त्रुटी, चुकलेले विधान व काही वगळले गेले असल्यास त्यासाठी खाली सही करणारा उत्तर देण्यास बांधील राहणार नाही.
7.2 राखीव किंमत ज्याखाली मालमत्ता विकली जाणार नाही, **ती अशी (1) मे. अवंत ग्रँड डेव्हलपमेंट्स प्रा. लि., यांच्या नावे असलेली ग्रा. पं. नेवरा, तिसवाडी, गोवा मधील काही भाग सर्व्हे क्र. 14/1, पोट विभाग १–बी असलेली नेवरी–ओ–पिकेन मधील मालमत्ता, कन्सल्ट ऑफिस एसडीओ तिसवाडी, जि. उत्तर गोवा 403104, राखीव किंमत : वरील परिच्छेद (1) मध्ये दिलेल्या मालमत्तेसंबंधी रु. 4,26,00,000/- (रु. चार कोटी सव्वीस लाख फक्त) आणि बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) वरील परिच्छेद (1) मध्ये दिलेल्या मालमत्तेसंबंधी रु. 42,60,00/- (रु. बेचाळीस लाख साठ हजार फक्त).**
7.3 इच्छुक बोलीदार, ज्यांनी वसुली अधिकारी–**1**, डीआरटी–**2**, दिल्ली यांच्या कार्यालयात **21.07.2025 रोजी संध्या. 5.00 पूर्वी** पॅन कार्ड, ओळखीचा पुरावा, पत्त्याचा पुरावा. इ. कागदपत्रांसह राखीव किंमतीपेक्षा कमी नसणारी त्यांची बोली सादर केली आहे ते **23.07.2025 रोजी सकाळी 11.00 ते 12.00** या वेळात होणाऱ्या ई–लिलावात भाग घेण्यास ते पात्र राहतील. लिलाव संपण्याच्या वेळेच्या शेवटच्या **5** मिनिटात बोली सादर केल्यास संपण्याची वेळ स्वयंचलित रितीने **5** मिनिटांसाठी वाढवली जाईल.
7.4 सदर मालमत्तेसंबंधी बोलीदार त्यांच्या बोली **रु. 5,00,000/- (रु. पाच लाख फक्त)** वा त्याच्या पटीत वाढवू शकतील.
7.5 अयशस्वी बोलीदारांनी ई–लिलाव विक्री प्रक्रिया संपल्यावर लगेचच **वसुली अधिकारी–1, डीआरटी–2, दिल्ली** यांच्या कार्यालयातून म्हणजे एसबीआय कडून त्यांनी जमा केलेल्या ईएमडी परत घ्याव्यात.
7.6 यशस्वी/सर्वोच्च बोलीदारांना ई–लिलाव संपल्यावर **24** तासांच्या आत वसुली अधिकारी–**1**, डीआरटी–**2**, **दिल्ली, खाते क्र. 121/2022** च्या नावे बोली/विक्री मूल्याच्या **25%** साठी डिमांड ड्राफ्ट/पेऑर्डर तयार करावा लागेल. आणि तो वसुली अधिकारी–**1**, डीआरटी–**2**, दिल्ली यांच्या कार्यालयात ई–लिलाव संपल्यापासून २४ तासांच्या आत पोहोचेल अशा रितीने पाठवावा/जमा करावा अन्यथा ईएमडी जप्त केली जाईल.
7.7 यशस्वी/सर्वोच्च बोलीदारांना मालमत्तेच्या लिलाव तारखेपासून **15** व्या दिवशी वा त्यापूर्वी वसुली अधिकारी–**1**, डीआरटी–**2**, दिल्ली यांचे नावे असलेल्या डिमांड ड्राफ्ट/पेऑर्डर च्या स्वरुपात विक्री प्रक्रियेची **75%** रक्कम जमा करावी लागेल, अशा दिवसांच्या खास वेळी, किंवा **15** वा दिवस रविवार वा इतर सुट्टीचा दिवस असल्यास, **15** व्या दिवसानंतरचा पहिला कामाच्या दिवशी रु. **1000/-** पर्यंत **2%** दराने व सदर रु. **1000/-** च्या वर **1%** दराने पाऊंडेज फी ती रक्कम जमा करावी. (जर उर्वरित **75%** रक्कम पोस्टाने पाठवायची असल्यास ती वर दिल्यानुसार वसुली अधिकारी–**1**, डीआरटी–**2**, दिल्ली यांचे कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे.
7.8 विहित वेळेत सदर भरणा जमा न केल्यास, विक्रीची नवीन उदघोषणा पारीत करून मालमत्तेची पुनर्विक्री केली जाईल. जमा केलेल्या रक्मा, खाली सही करणाऱ्यास योग्य वाटेल त्यानुसार विक्रीचा खर्च डीफ्रे करून सदर रकमा सरकारजमा केल्या जातील व बुडवेगिरी करणाऱ्या सदर खरेदीदाराचे सदर मालमत्तेवरील सर्व दावे किंवा जमा केलेल्या रकमा जप्त केल्या जातील.
8. **मालमत्ता जसे आहे जेथे आहे** या तत्वावर विकली जाईल.
9. त्यासाठी कोणतेही कारण न देता जर अवाजवी वाटल्यास कोणतीही वा सर्व बोली स्वीकारण्याचा वा फेटाळण्याचा किंवा कोमत्याही वेळी लिलाव पुढे ढकलण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

मालम्त्तेची अनुसुची

विकावयाच्या मालमत्तेचे वर्णन	मालमत्ता वा त्याचा कोणताही भागावरील काढलेला महसूल	मालमत्तेवरील देय कोणत्याही अन्य भारांचा तपशील	दावे, काही असल्यास, जे मालमत्तेवर आहेत व त्यावरील कोणत्याही अन्य ज्ञात भारांचा तपशील व त्यांचे स्वरुप व मूल्य
मे. अवंत ग्रँड डेव्हलपमेंट्स प्रा. लि., यांच्या नावे असलेली ग्रा. पं. नेवरा, तिसवाडी, गोवा मधील काही भाग सर्व्हे क्र. 14/1, पोट विभाग 1–बी असलेली नेवरी–ओ–पिकेन मधील मालमत्ता, कन्सल्ट ऑफिस एसडीओ तिसवाडी, जि. उत्तर गोवा 403104	माहित नाही	माहित नाही	माहित नाही

माझ्या स्वाक्षरीने व शिक्क्यानिशी जानेवारी 26.05.2025 रोजी दिले.

(वात्सल्या कुमार)
वसुली अधिकारी, डीआरटी–2, दिल्ली.

कॅब अॅग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वांवर 'सिटू'चा आक्षेप

ओला ,उबेरच्या च्या संभाव्य वर्चस्वाविरोधात तीव्र भूमिका | मार्गदर्शक तत्त्वांना स्थगिती देण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. १९ : गोवा सरकारने जारी केलेल्या कॅब अॅग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वांविरोधात भारतीय कामगार संघटनेच्या ('सिटू') गोवा शाखेने तीव्र आक्षेप नोंदवत संचालक, परिवहन विभाग, पणजी यांना अधिकृत निवेदन सादर केले आहे.

या निवेदनात 'सिटू'ने स्पष्टपणे म्हटले आहे की, प्रस्तावित मार्गदर्शक तत्त्वांमुळे खाजगी टॅक्सी व्यवसाय धोक्यात येईल, आणि अंतरराष्ट्रीय कंपन्या जसे की ओला व उबर गोव्यात वर्चस्व प्रस्थापित करतील. याचा परिणाम म्हणून हजारो स्थानिक चालक व टॅक्सी मालकांची उपजीविका धोक्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

'सिटू'ने नमूद केले की, २०१२ पासून खाण उद्योग बंद झाल्यामुळे गोव्यात रोजगार संधींचा अभाव निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पर्यटन क्षेत्र, विशेषतः खाजगी टॅक्सी सेवा, अनेक तरुण आणि कामगारांसाठी उपजीविकेचे महत्त्वाचे साधन ठरले आहे. सरकारी आकडेवारी उपलब्ध नसली तरी हजारो चालक व टॅक्सी मालक या व्यवसायावर अवलंबून आहेत.

निवेदनात असेही नमूद करण्यात आले आहे की, प्रस्तावित मसुदा हे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हिताचे रक्षण करणारे असून, ते स्थानिक चालक व कामगारांच्या विरोधात आहेत. मुंबई, दिल्ली, हैदराबाद यांसारख्या शहरांतील अनुभवाचा दाखला देत 'सिटू'ने म्हटले आहे की, प्रारंभी आकर्षक उत्पन्नाचे आश्वासन देऊन नंतर चालकांचे उत्पन्न कमी केले गेले आहे, आणि अनेकांनी आर्थिक विवंचनेत आत्महत्या केल्या आहेत.

'सिटू'ने मुख्यमंत्र्यांचे अलीकडील विधान उद्धृत केले आहे, ज्यात त्यांनी म्हटले होते की गोव्यात ओला आणि उबर यासारख्या सेवा आणण्याचा सरकारचा कोणताही इरादा नाही. मात्र, सद्य प्रस्तावित मार्गदर्शक तत्त्वे मुख्यमंत्र्यांच्या विधानाच्या विरुद्ध असल्याचे 'सिटू'चे मत आहे.

त्याचप्रमाणे, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत केलेल्या विधानाचा उल्लेख करत, ते म्हणाले की केंद्र सरकार स्वतःचे एक पर्यायी अॅप तयार करत आहे. अशा स्थितीत, गोवा सरकारची तत्काळ अंमलबजावणीची घाई असमंजस आणि लोकहिताविरोधी असल्याचे 'सिटू'ने म्हटले आहे.

'सिटू'ने गोवा सरकारकडे मागणी केली आहे की,केंद्र सरकारचे अधिकृत अॅप येईपर्यंत राज्य सरकारने प्रस्तावित मार्गदर्शक तत्त्वांवर तात्पुरती स्थगितीलागू करावी.तसेच प्रस्तावावर निर्णय घेण्यापूर्वी टॅक्सी चालक संघटनांशी, नागरी प्रतिनिधींशी, अभ्यासक व सामाजिक क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद व सखोल अभ्यास करावा.या निवेदनावर अध्यक्ष नरेश शिगावकर आणि सरचिटणीस नीलकांत फडते यांची स्वाक्षरी आहे.

मार्गदर्शक तत्त्वांवरील 'सिटू'चे प्रमुख आक्षेप

नियम ३(ड): सरकारकडून परवाना मंजूर केला जाईल या वाक्याऐवजी परवाना मंजूर केला जाऊ शकतो अशी अट टाकावी.

नियम ४: भक्षक दर रोखण्यासाठी कोणतीही तरतूद नाही.

ड्रायव्हर्सचे कामगार हक्क: अॅग्रीगेटर कंपन्यांकडून ड्रायव्हर्सना कर्मचारी न मानता कंत्राटी स्वरूपात वागवले जाते, ज्यामुळे त्यांच्या हक्कांवर गदा येते.

अल्गोरिदमची पारदर्शकता: अॅग्रीगेटर कंपन्यांचे भाडे ठरवण्याचे पद्धती वळिवश वळींीळलींळेप प्रणाली गोपनीय असून, त्याचा गैरवापर करून ड्रायव्हर्स व प्रवाशांचे आर्थिक शोषण केले जाते.